सुविचार

माझ्याने नाही होणार" असं विचारू नका, तर "माझ्याशिवाय हे कोण करू शकणार ?" असं विचार करा.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 30 ■ रविवार, 19 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com



SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615


# तुळजाभवानी मंदिरातील लाडू प्रसादाचा प्रयोग अपयशी महिन्याला केवळ 35 ते 40 हजार लाडूंची विक्री

## लाडूच्या दरावरून भाविकांची नाराजी; मंदिर संस्थान निर्णय बदलणार का ?

सूरज बागल । आरंभ मराठी

**तुळजापूर - महाराष्ट्राचे एक प्रमुख शक्तीपीठ असलेले आई तुळजाभवानी मंदिर तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून आलेल्या भाविकांसाठी लाडू प्रसादाची सुविधा देण्यात आली आहे. गेल्या आठ महिन्यांपासून ही लाडू विक्री सुरू असली तरी या लाडूच्या दराबाबत मात्र प्रचंड नाराजी दिसून येत आहे. पन्नास ग्रामचा लाडू हा 30 रुपयांना मिळत असल्याने भाविकांचा प्रतिसाद हा कमी असल्याचे दिसून येत आहे. महिन्याला लाखो भाविक दर्शनाला येत असूनही केवळ 30 ते 35 हजार भाविकच लाडू प्रसादाची खरेदी करत असल्यामुळे हा प्रयोग फसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे याबाबत आता मंदिर संस्थांनकडून लाडू दराबाबत पुनर्विचार करण्याची मागणी सर्वसामान्य भाविकातून होत आहे.**





महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी वर्षभरात कोट्यवधी भाविक तुळजापूरला येत असतात. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा या भागातील भाविकांची संख्या मोठी असते. तुळजापूरला आलेल्या भाविकांना प्रसाद म्हणून सोबत काहीतरी नेता यावे यासाठी मंदिर संस्थांनने जुलै महिन्यापासून लाडू प्रसाद म्हणून त्याची विक्री सुरू केली आहे. मात्र, गेल्या आठ महिन्यांमध्ये भाविकांचा या प्रसादास प्रतिसाद कमी मिळालेला दिसून येत आहे. यासाठी मुख्य कारण



म्हणजे या लाडू प्रसादाचा दर असे सांगण्यात येत आहे. एका 50 ग्रॅमच्या लाडूसाठी 30 रुपये दर आकारण्यात येत असून यामुळे सर्वसामान्य गोरगरीब भाविक हे लाडू घेऊ शकत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता मंदिर संस्थांनने

या लाडू दराबाबत पुनर्विचार करून लाडू प्रसादाची किंमत कमी करण्याची मागणी होत आहे. तुळजापूरला येणारा बहुतांशी भावीक हा गरीब व मध्यमवर्गीय वर्गातील असतात. त्यामुळे आलेल्या भाविकांना हा 30 रुपयांचा लाडू परवडणारा नसल्याचे दिसून येत आहे. बाजारामध्ये लाडूची किंमत दोनशे ते अडीचशे रुपये किलो आहे, मात्र मंदिर संस्थांनचा हा लाडू सहाशे रुपये किलो इतक्या दराचा आहे. त्यामुळे भाविकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे.

### पुनर्विचार करण्याची गरज

या लाडू प्रसादाचा दर जास्त असल्याने भाविकांचा प्रतिसाद कमी मिळत आहे. मंदिर संस्थांनकडून याबाबत पुनर्विचार करणे गरजेचे असून कमी दरामध्ये लाडू प्रसाद उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सध्या तीस रुपयांना एक लाडू देण्यात येत असून त्यामुळे भाविकांनी याकडे पाठ फिरवल्याची दिसून येत आहे. त्यामुळे मंदिर संस्थांनने दराच्या निर्णयाबाबत पुनर्नविचार करणे गरजेचे आहे.

**किशोर गंगणे**
माजी अध्यक्ष, पुजारी मंडळ, तुळजापूर.

### गेल्या सहा महिन्यातील लाडू विक्रीचा आढावा

ऑक्टोबर – 36 हजार 236
नोव्हेंबर – 33 हजार 948
डिसेंबर – 69 हजार 903
जानेवारी – 61 हजार 775
फेब्रुवारी – 41 हजार 549
मार्च – 43 हजार 841

तुळजापूरला येणाऱ्या भाविकांच्या संख्येचा विचार करता लाडू प्रसादाला मिळणारा प्रतिसाद कमी दिसून येत आहे. मंगळवार, शुक्रवार, रविवार या दिवशी मोठ्या प्रमाणात भाविक तुळजापूरला येत असतात, मात्र महिन्याकाठी लाडूची विक्री ही चाळीस हजाराच्या आसपास दिसून येते. त्यामुळे अत्यंत कमी भाविक हा लाडू घेऊन जात असल्याचे स्पष्ट होत आहे. तुळजाभवानी मंदिरातील लाडू प्रसादाच्या दरामुळे भाविकांमध्ये नाराजी असून मंदिर संस्थानने याकडे गांभीर्याने लक्ष देत योग्य निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### भाविकांच्या श्रद्धेचा व्यवहार केला

हा महाप्रसाद ना भाविकांना परवडणारा आहे, ना स्थानिक नागरिकांना. विशेष म्हणजे मंदिर प्रशासनालाही यात आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे बोलले जात आहे. मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी महाप्रसाद हा श्रद्धेचा विषय असतो, परंतु सध्याच्या परिस्थितीत तो एक व्यावसायिक व्यवहार बनल्याचे दिसून येते. यामागे ठेकेदार आणि ठेका देणाऱ्या यंत्रणेला आर्थिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न असल्याची शंका निर्माण होते. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेची सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. महाप्रसादाचा दर सर्वसामान्य भाविकांना परवडेल असा ठेवण्यात यावा, तसेच पारदर्शकता आणि जनहित लक्षात घेऊन निर्णय घेण्यात यावा.

**जयकुमार नागनाथ पांढरे**
माहिती अधिकार कार्यकर्ते.

# कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात 30 एप्रिलपर्यंत शस्त्र व जमावबंदी लागू

आरंभ मराठी । धाराशिव

एप्रिल महिन्यात जिल्ह्यात होणाऱ्या विविध सण-उत्सव, स्पर्धापरीक्षा, सभा, बैठका तसेच धरणे- आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू करण्यात आल्याची माहिती अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी दिली आहे. दि.१२ ते २२ एप्रिल दरम्यान संत गोरोबा काका यात्रा (तेर) तसेच दि.१४ ते ३० एप्रिल दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, दि.१९ एप्रिल रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती (पारंपारिक), महात्मा बसवेश्वर जयंती,परशुराम जयंती असे विविध यात्रा व उत्सव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर साजरे केले जात असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. सध्या जिल्ह्यात हिंदू समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळे उभारणे तसेच बौद्ध समाजाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे उभारण्याच्या कारणावरून दोन्ही समाजांमध्ये तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याशिवाय विविध संघटना व राजकीय पक्षांकडून विविध मागण्यांसाठी शासकीय कार्यालयांसमोर धरणे, मोर्चे, आंदोलन, उपोषण, आत्मदहन, बंद, निदर्शने, तालाठोको व रास्तारोको यांसारखे आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य परिस्थिती हाताळण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये दि.१६ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीपासून ते दि.३० एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.

# अक्षय तृतीयेनिमित्त बाजारात आंब्यांची आवक वाढली: यंदा भावही वाढले





आरंभ मराठी । कळंब

अक्षय तृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक अत्यंत शुभ दिवस मानला जातो. या दिवशी सोन्याच्या खरेदीसोबतच आंबा खरेदीलाही विशेष महत्त्व असते. पारंपरिकरित्या देवपूजेत आंब्याचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा असून, पिकलेला आंबा गोडवा, समाधान आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. मात्र यंदा कळंब बाजारात गावरान आंब्याची मोठी टंचाई जाणवत आहे. बाजारात हापूस, केशर, बदाम, लालबाग अशा विविध जातींचे आंबे उपलब्ध झाले असले तरी नैसर्गिकरित्या पिकलेल्या गावरान आंब्याचा दरवळ आणि चव ग्राहकांना अनुभवता येत नाही. अनेक ठिकाणी कृत्रिम पद्धतीने पिकवलेले आंबे विक्रीस असल्याने ग्राहक नाईलाजाने त्याच आंब्यांची खरेदी करत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, आंब्यांच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे ग्राहकांच्या खिशावरही ताण पडत आहे. यंदा केशर आंबा २५० ते ३०० रुपये किलो मिळत आहे. तर बदाम आंबा १५० रुपये किलो मिळत आहे. हापूस आंब्याचे दर अजूनही आवाक्याबाहेर आहेत.

# कळंब शहरात पाणीटंचाई टाळण्यासाठी नगर परिषद सज्ज; बंद बोअरवेल दुरुस्तीला वेग

**कळंब** :- वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर कळंब शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत. शहरातील अनेक वर्षांपासून बंद पडलेले बोअरवेल दुरुस्त करून अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. प्रभाग क्रमांक ०४ मधील श्री खंडोबा मंदिर व तथागत बौद्ध विहार परिसरातील बंद पडलेले बोअरवेल उपनगराध्यक्ष मा. लखन गायकवाड यांच्या पुढाकारातून दुरुस्त करून पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांना दिलासा मिळाला असून पाणीपुरवठा सुधारण्यास मदत होत आहे. यासोबतच शहरातील इतर भागांमध्येही बंद अवस्थेत असलेल्या नगरपरिषदेच्या बोअरवेलचा आढावा घेण्यात येत आहे. संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देऊन हे बोअरवेल टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याची माहिती नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी आप्पा कापसे यांनी दिली. नगरपरिषद प्रशासन, नगरसेवक आणि पाणीपुरवठा विभाग यांच्यात समन्वय साधत ही मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन नागरिकांना अखंडित व पुरेसा पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

### सुनियोजित पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील कोणत्याही नागरिकाला पाणीटंचाईचा त्रास होऊ नये, ही आमची प्राथमिकता आहे. त्यासाठी नगरपरिषद प्रशासन, सर्व नगरसेवक तसेच पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी समन्वयाने काम करत आहेत. शहरातील बंद पडलेले सर्व बोअरवेल टप्प्याटप्प्याने सुरू करून अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**सुनंदा शिवाजी कापसे**
नगराध्यक्षा, नगरपरिषद कळंब.

# दोन लाखांसाठी पत्नीचा गळा आवळून खून; उमरग्यात थरारक घटना

**उमरगा** :- शहरात पैशांच्या कारणासाठी पत्नीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कर्ज फेडण्यासाठी आणि दुचाकीचे दुकान सुरू करण्यासाठी दोन लाख रुपये आणण्याच्या कारणावरून पतीनेच पत्नीची हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे.याप्रकरणी उमरगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना 17 एप्रिल रोजी रात्री शहरातील डिग्गी रोड परिसरात घडली. 18 एप्रिल रोजी सायंकाळी 7.35 वाजता गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या प्रकरणात केशर धनाजी शिंदे (वय 43, रा. कुंभार पट्टी, उमरगा) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी दत्ता शामराव कांबळे (वय 27, मूळ रा. उजळंब, ता. बसवकल्याण, जि. बीदर, कर्नाटक) याच्यावर पत्नी पलक दत्ता कांबळे (वय 22) हिचा खून केल्याचा आरोप आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पत्नीला तिच्या आईकडून दोन लाख रुपये आणण्यासाठी वारंवार त्रास दिला. कर्ज फेडणे आणि टू-व्हिलरचे दुकान सुरू करणे या कारणासाठी पैशांची मागणी केली जात होती. या वादातूनच आरोपीने पत्नीचा गळा आवळून खून केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

आरंभ मराठी

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

# भाजपच्या तालुका उपाध्यक्षपदी पांडुरंग माने यांची निवड

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव ग्रामीण पूर्व मंडळाच्या उपाध्यक्षपदी पांडुरंग विश्वनाथ माने यांची नियुक्ती करण्यात आली असून, आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. धाराशिव ग्रामीण पूर्व मंडळाचे अध्यक्ष निळकंठ पाटील यांच्या उपस्थितीत आणि आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते माने यांना हे नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी माने यांच्या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नव्या जबाबदारीत सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेत पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पक्षाचे विचार पोहोचवून प्रभावी कामगिरी करण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.दरम्यान, या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, माने यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक कामाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. माने यांनी काही महिन्यापूर्वीच शिवसेना उबाठा गटाला जय महाराष्ट्र करून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन होत आहे.

# वादळी वाऱ्यामुळे सलगरा मड्डीतील शेतीपिकांचे मोठे नुकसान, तात्काळ मदतीची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर



तुळजापूर तालुक्यातील सलगरा मड्डी येथे शुक्रवारी (दि.१७) सायंकाळी आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने अक्षरशः कहर माजवला. या अवकाळी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांसह गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास अचानक वाऱ्याचा वेग प्रचंड वाढला आणि त्यासोबत मुसळधार पावसाने हजेरी लावली. या वादळी परिस्थितीत शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले. विशेषतः आंबा, पपई आणि ज्वारी या पिकांना मोठा फटका बसला आहे. काढणीस आलेल्या आंब्याच्या बागांमध्ये मोठ्या प्रमाणावर फळगळ झाली असून अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे गावातील अनेक घरांवरील पत्रे उडून गेले. काही ठिकाणी पत्रे व दगड खाली पडल्याने महिला व पुरुष जखमी झाल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच संबंधित तलाठ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याने शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी व ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. दरम्यान, आंब्याच्या झाडांवरील जवळपास सर्वच फळे गळून पडल्याने बागायतदार शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

# मानव कल्याणासाठी आयुष्य समर्पित करणारे महात्मा बसवेश्वर



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो. नं. ९९२१६९०७७९,
नागपूर.



मानव समाजाच्या उन्नतीसाठी आणि समतेच्या प्रस्थापनेसाठी महात्मा बसवेश्वरांचे कार्य अत्यंत मोलाचे ठरले आहे. बसव, बसवण्णा अशा विविध नावांनी ओळखले जाणारे महात्मा बसवेश्वर हे केवळ संतच नव्हते, तर थोर समाजसुधारक आणि लोकहितवादी विचारवंत होते. त्यांच्या आयुष्यभराच्या कार्यामुळे त्यांना न्यायप्रिय आणि निस्वार्थी नेतृत्वाचे प्रतीक मानले जाते. त्यांना कोणत्याही प्रकारचा लोभ नव्हता, त्यामुळे त्यांनी समाजासाठी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केले.इ.स. ११०५ ते ११६५ या कालखंडात कर्नाटकात जन्मलेल्या बसवेश्वरांनी निर्गुण व निराकार एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. त्यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी येथे वीरशैव कुटुंबात अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर झाला. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जात असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. लहान वयातच त्यांनी कर्मठ व रूढीवादी प्रथांचा विरोध केला. मुंजीसारख्या विधींना त्यांनी नकार देत, "मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे," असे सांगून वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी घर सोडले आणि कुडलसंगम येथे गेले. कृष्णा आणि मलप्रभा नद्यांच्या संगमावर असलेल्या कुडलसंगम येथे त्यांनी तब्बल १२ वर्षे राहून विविध भाषा, धर्म आणि तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. त्या काळातील हे एक महत्त्वाचे अध्ययन केंद्र होते. पुढे त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला आणि ते सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे आले. येथे त्यांनी लोकशाही तत्त्वांवर आधारित 'अनुभव मंटप' ही एक प्रकारची संसद स्थापन केली. या ठिकाणी सर्व धर्म, जाती आणि पंथातील लोक एकत्र येऊन सामाजिक समस्यांवर चर्चा करत आणि त्यावर योग्य तो मार्ग काढत. त्यामुळे१२ व्या शतकातच लोकशाहीची बीजे रोवण्याचे कार्य त्यांनी केले, असे मानले जाते.बसवेश्वरांचे मुख्य उद्दिष्ट होते – समाजातील वाईट चालीरीतींचा विरोध करून समता, न्याय, बंधुता आणि एकात्मतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करणे. त्यांच्या विचारांमध्ये स्वातंत्र्य, अधिकार, शिस्त, सुशासन आणि पारदर्शकता यांना विशेष महत्त्व होते. त्यांच्या 'अनुभव मंटपा'त कोणत्याही प्रकारच्या जातिभेदाला स्थान नव्हते, त्यामुळे समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यास मदत झाली.आजच्या २१ व्या शतकातील अनेक कायदे आणि सामाजिक मूल्यांमध्ये बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी संस्कृतमधील धर्मतत्त्वे कन्नड भाषेत मांडून ती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या वचनांमधून आध्यात्मिकता आणि नैतिकतेचे महत्त्व स्पष्ट होते. आजही कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रातील लोकांच्या जिभेवर त्यांची वचने आहेत. बसवेश्वरांनी सत्ता, वैभव आणि कीर्ती यांचा कधीही मोह ठेवला नाही. त्यांनी नेहमीच आध्यात्मिक जीवन आणि नैतिक मूल्यांना प्राधान्य दिले. समाजातील स्त्रियांवर होणारे अन्याय, त्यांची दुय्यम वागणूक याविरोधात त्यांनी ठाम भूमिका घेतली. त्या काळात स्त्रियांना शूद्र आणि बहिष्कृत मानले जात असताना त्यांनी त्यांच्या सन्मानासाठी संघर्ष केला. तत्कालीन समाजव्यवस्थेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह त्यांच्या पुढाकाराने घडवून आणला, जो त्या काळात अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. त्यामुळे बसवेश्वरांचे जीवन आणि कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरते. आजच्या राजकीय नेत्यांनी बसवेश्वरांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करण्याची नितांत गरज आहे. भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि जनकल्याणकारी प्रशासन उभारण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे आवश्यक आहे. स्वतःच्या फायद्यापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणे, अनावश्यक संपत्तीचा त्याग करून ती जनतेच्या सेवेसाठी वापरणे, हीच खरी बसवेश्वरांना अभिवादन ठरेल. बसवेश्वर महाराजांनी कोणतेही मोठे पद नसतानाही समाजासाठी अहोरात्र कार्य केले. त्यांचा त्याग, निष्ठा आणि समाजसेवेची वृत्ती प्रत्येकासाठी आदर्श आहे. वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय तृतीया हा त्यांचा जन्मदिन असल्याने या दिवशी त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प प्रत्येकाने करायला हवा. आजच्या काळात पर्यावरण संरक्षण हीदेखील मानवजातीसमोरील मोठी समस्या आहे. त्यामुळे बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावण्याचा संकल्प करून पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी योगदान द्यावे, हीच खरी त्यांना अभिवादन ठरेल.

# सामाजिक क्रांतीचे जनक: महात्मा बसवेश्वर



सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात-पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे.जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## त्रिकोळीतील शेख जिंदावली यात्रेनिमित्त रक्तदान शिबिर

### ५० हून अधिक रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग




आरंभ मराठी । उमरगा

त्रिकोळी येथे शेख जिंदावली यात्रेच्या औचित्य साधून क्लासमेट ग्रुप यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. काशिविश्वनाथ मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थ व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन सकाळी करण्यात आले. यावेळी आयोजकांनी यात्रेमध्ये भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक असल्याचे सांगत, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असून या माध्यमातून अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात, असे मत व्यक्त केले. या शिबिरात ५० हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले. विशेष म्हणजे महिला व तरुण वर्गाचा मोठा सहभाग दिसून आला. प्रथमच रक्तदान करणाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.शिबिर यशस्वी करण्यासाठी क्लासमेट ग्रुप यांनी विशेष मेहनत घेतली. सहभागी रक्तदात्यांना प्रमाणपत्र व पाण्याचे झार देऊन सन्मानित करण्यात आले. यात्रेच्या निमित्ताने आयोजित हा सामाजिक उपक्रम सर्वत्र कौतुकास्पद ठरला.

## मृत जन्मलेल्या अर्भकाची अयोग्य विल्हेवाट

### महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**धाराशिव** :- जन्मतः मृत अवस्थेत जन्मलेल्या स्त्री जातीच्या अर्भकाची अयोग्य प्रकारे विल्हेवाट लावल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी सुनिता प्रज्योत उंदरे (वय 40, रा. वाशी ता. वाशी जि. धाराशिव) यांनी दिनांक 9 ऑक्टोबर 2025 रोजी मध्यरात्री सुमारास जिल्हा स्त्री रुग्णालय, धाराशिव येथे प्रसूती झाली होती. या वेळी जन्मलेल्या अर्भकाचा मृत्यू झालेला होता. अशा परिस्थितीत अर्भकाचा योग्य पद्धतीने अंत्यविधी करणे अपेक्षित असताना, संबंधित महिलेने अर्भकाला कचऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निळ्या रंगाच्या पॉलिथीन पिशवीत टाकून त्याची अयोग्य प्रकारे विल्हेवाट लावल्याचा आरोप आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आनंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सत्यवान लक्ष्मण आगरकर यांनी दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय दंड संहिता कलम 94 अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# मोठेपणा मिरवावा पण कशाचा ?

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.



एका मित्राच्या मुलीचा साखरपुडा होता. मित्राच्या आग्रहास्तव मी त्या साखरपुड्याच्या कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित होतो. मुलाकडचे सर्वच नातेवाईक त्यांच्या शेतीचा, संपत्तीचा,नोकरीचा,पदाचा,घराचा मोठेपणा मिठ मिरच्या लावून सांगत होते. आमचं असे आहे नि आमचं तसं आहे. आमची संपत्ती, शेती,गाडी बंगला,जायदाद एवढी आणि आमचा मोठेपणा तेवढा.हे ऐकून आमचे कान किट्ट झाले होते. त्यामुळे हा कार्यक्रम कधी संपतो नि यांच्या मोठेपणाची कटकट कधी संपेल असे आम्हाला वाटत होते. परंतु,काही लोकांना भारी हौस असते स्वतःचा मोठेपणा स्वतःच मिरवायची,स्वतःचे मोठेपण स्वतः सांगायची. एखाद्या कार्यक्रमात गेल्यावर आणि चारचौघांत बसल्यावर काही व्यक्ती बोलघेवडेपणादाखवतआपलामोठेपणासांगायला सुरुवात करतात.त्यांचा मोठेपणा खरा की खोटा हे त्यांनाच माहीत असते.कोणी शेतीचा मोठेपणा सांगतात.कोणी संपत्तीचा,कोणी पैशाचा,कोणी पदाचा तर कोणी स्वतःच्या शिक्षणाचा मोठेपणा सांगतात.मात्र मोठेपणा मिरवणारे लोक खरोखर चांगले असतात का?कारण चांगले लोक स्वतःचा मोठेपणा स्वतःच मिरवत नाहीत. आपण फार मोठे आहोत असे कधी दाखवत नाहीत.फुलांचा सुगंध वाऱ्याबरोबर चोहीकडे दरवळतो.आम्ही फार सुंगधी फुले आहोत असे स्वतः कधी सांगत नाहीत. ज्ञानी माणसे शांत,संयमी, मितभाषी आणि कर्तृत्ववान असतात.आम्ही फार ज्ञानी आहोत असे स्पीकर लावून ते सांगत नाहीत. मोठेपणा मिरवायचा नसतो तो चांगल्या कृतीतून,चांगले वागणे व बोलणे यातून व मानवतावादी वर्तनातून दाखवायचा असतो.

अफरातफर करून, भ्रष्टाचार करून अमाप संपत्ती कमावल्याने मोठेपणा मिळत नाही. वाईट वागून व उर्मट बोलून मोठेपणा कसा हो मिळेल? काहींना स्वतःच्या जातीचा मोठेपणा मिरवायची फार हौस असते,काहींना सौंदर्याचा मोठेपणा मिरवावा वाटतो. इतरांचा अपमान केल्यावर,दुसऱ्यांना नावे ठेवल्यावर आणि सोबतच्यांना कमी लेखल्याने मोठेपणा मिळणे कदापि शक्य नाही.एखाद्या कामानिमित्त जेव्हा शहरात राहणाऱ्या मित्रांच्या घरी किंवा नातेवाईकांच्या घरी जावे लागते तेव्हा ते त्यांचे अलिशान घर कसे शानदार बांधले आहे हे घरात फिरवत फार आवडीने सांगतात .पण त्यांच्या त्या अलिशान घरात त्यांचे आईवडील कोठेच दिसत नाहीत. ते गावाकडेच पडक्या घरात राहतात.अशी माणुसकीहीन परिस्थिती असेल तर घराचा मोठेपणा कशाला दाखवायचा? मोठेपणा मिरवावा चारित्र्याचा, आत्मसात केलेल्या कलागुणांचा, चांगल्या विचारांचा आणि आपल्या सद्वर्तनाचा.मोठेपणा मिरवावा निर्व्यसनी जीवनाचा,आपल्या ठायी असलेल्या मानवतेचा. ज्यांना प्रत्येक वेळी ढोंगी कर्तृत्वाचा व वाईट गुणांचा मोठेपणा मिरवावा वाटतो त्यांनी एकदा स्मशानभूमीत फेरफटका मारावा. तेव्हा त्यांना कळेल की सतत मोठेपणाचा टेंभा मिरवणारे आणि गर्विष्ठ जीवन जगणारे एकसे बढकर एक व्यक्ती स्मशानात राख बनुन गुपचूप पडले आहेत! तेव्हा विनाकारण आणि नको तेव्हा मोठेपणा मिरविण्याची प्रवृत्ती व मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

## वडगाव काटी येथे घरफोडी

**तुळजापूरः-** तालुक्यातील वडगाव काटी येथे घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी धनाजी ज्ञानोबा धावणे (वय ५७, रा. वडगाव काटी) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने १७ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास तोडून घरात प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी घरातील सुमारे ४८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, एकूण अंदाजे २ लाख ७५ हजार रुपयांच्या किंमतीचे, चोरून नेले. या प्रकरणी धनाजी धावणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**कार्यालय**
जिल्हा वक्फ अधिकारी, धाराशिव
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, हॉल क्र ९२ (सेंट्रल बिल्डींग), धाराशिव

संचिका क्र. ६९/ /२०२६
क्र. वक्फ-जिवअ/ चौकशी-/ ६४०/ २०२६.
दिनांक:- 07 APR 2026

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**
**वक्फ संस्थेचे नाव व पत्ता: वक्फ संस्था मस्जिद महेदियान मौजे, परंडा ता. परंडा जि. धाराशिव**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असून अर्जदार श्री. मैनुद्दीन अब्दुल रज्जाक तुटके यांनी दिनांक ०६.०४.२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ/जिल्हा वक्फ अधिकारी धाराशिवकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे.प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ (पाच) वर्षांचा असून,व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित विश्वस्त नवीन विश्वस्तांची नेमणूक करतील अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | मैनुद्दीन अब्दुल रज्जाक तुटके | अध्यक्ष |
| 2 | मुस्तफा इमाम चौधरी | उपाध्यक्ष |
| 3 | मोहमंद इलियास गुलाममोहीयोद्दीन कळंबकर | सचिव |
| 4 | अरबाज अयुब तुटके | सदस्य |
| 5 | अरीफ अजिज विजापुरे | सदस्य |
| 6 | इसा अब्दुल जिनेरी | सदस्य |
| 7 | महेदी मुस्तफा हन्नुरे | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, हॉल क्र ९२ (सेंट्रल बिल्डींग) धाराशिव येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

(सय्यद आमेर)
जिल्हा वक्फ अधिकारी
धाराशिव

# निसर्गातील बदल आणि माणसाचे वास्तव

किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१





निसर्गातील बदल आपल्या पद्धतीने सतत होत राहतात. ऋतुचक्र हे न थांबणारे चक्र आहे. ते अविरतपणे, निर्दयपणे फिरत राहते. प्रत्येक ऋतू आपले सौम्य ते उग्र रूप दाखवत पुढे सरकत असतो. उन्हाळा आता आपल्या ऐन भरात आला आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरांत सध्या ४० सेल्सिअसच्या पुढे तापमान नोंदवले जात आहे. वृत्तपत्रांमध्ये उष्णतेचे वर्णन करणाऱ्या शब्दरचना गमतीशीर वाटतात, पण त्या उन्हाची तीव्रता स्पष्ट करण्यास पुरेशा असतात. सूर्य अक्षरशः आग ओकत आहे, उन्हाचा आगडोंब उसळला आहे, अंगाची लाही-लाही होत आहे, उष्णतेची लाट आली आहे, अमुक शहर होरपळून निघत आहे अशा बातम्यांमधून वाढत्या तापमानाचे चित्र उभे राहते. या शब्दरचनांमुळे मनाला थोडासा का होईना, थंडावा मिळतो.पण प्रत्यक्षात सर्वसामान्य जनतेची अवस्था मात्र बिकट झाली आहे. जंगलातील प्राणीमात्रांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. अनेक ठिकाणी पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. पक्षी तहानेने व्याकूळ होतात. कष्टकरी वर्गाला उन्हातच श्रम करावे लागतात. शेतकरी, बांधकाम मजूर, रस्ते कामगार, वाहतूक कर्मचारी, स्वयंपाकी, कारखान्यातील कामगार—यांच्यासाठी उन्हाळा म्हणजे शरीराला पीडा देत जगण्याची वेळ होय.

पावसाळ्यातील अतिवृष्टी, हिवाळ्यातील थंडीची लाट आणि उन्हाळ्यातील विक्रमी तापमान—हे सर्व मानवाला निसर्गाने दिलेले इशारे आहेत. निसर्ग जणू सांगत असतो, "माझी कृपादृष्टी तुझ्यावर आहेच; पण माझी वक्रदृष्टीही लक्षात ठेव." म्हणूनच कधी तो पावसाच्या रूपाने, कधी थंडीच्या लाटेने, तर कधी उष्णतेच्या तडाख्याने आपली ताकद दाखवून देतो. माणसानेही स्वतःच्या सुखासाठी निसर्गावर अनेक प्रकारे आघात केले आहेत. झाडांची तोड करून कॉंक्रीटची जंगले उभी केली. मोकळी मैदाने, जलस्त्रोत आणि शेतीची जमीन नष्ट केली. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी पंखे, कुलर, एसी अशी साधने निर्माण केली. आज तो "गर्मी में भी थंडी का एहसास" घेत जगत आहे. पण हे करताना पृथ्वीचे तापमान वाढवण्यात आपलाही मोठा वाटा आहे, हे तो विसरतो.

बर्फाचे गोळे, आईस्क्रीम, थंड पेये यांचा आस्वाद घेताना माणूस ऋतुमानानुसार बदलणाऱ्या बाजारू जीवनशैलीचा गुलाम होत चालला आहे. आजचा माणूस कृत्रिम आणि नैसर्गिक जीवनशैली यांच्या मधोमध हेलकावे खात जगत आहे. कोणताही नैसर्गिक प्रकोप सर्वाधिक त्रास तळागाळातील माणसालाच देतो. श्रीमंत माणूस वातानुकूलित घरात बसून उन्हाचा सामना करू शकतो; पण गरीबाला उन्हातच राबावे लागते. त्यामुळे निसर्गाचे संकट हे सर्वांना समान नसते, ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. उन्हापासून बचाव करण्यासाठी दुपारी बाहेर न पडण्याच्या सूचना दिल्या जातात; पण रोजंदारीवर जगणाऱ्यांसाठी त्या व्यर्थ ठरतात. "जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे" या म्हणीप्रमाणे, एकाच ऋतूचा अनुभव प्रत्येकासाठी वेगळा असतो. कोणासाठी उन्हाळा सुट्ट्यांचा आनंद असतो, तर कोणासाठी जगण्यासाठीचा संघर्ष.

आज गरज आहे ती निसर्गाशी संघर्ष करण्याची नाही, तर निसर्गाशी मैत्री करण्याची. वृक्षलागवड, पाण्याची बचत, प्रदूषण कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आणि संसाधनांचा संयमी वापर करणे—ही काळाची गरज आहे.लवकरात लवकर वाढत्या तापमानाची तीव्रता कमी व्हावी, वातावरण सुसह्य व्हावे आणि सर्व सजीवांना दिलासा मिळावा, हीच प्रार्थना.निसर्ग हा शत्रू नाही, तो आपला जीवनदाता आहे. त्याचा सन्मान करूया, त्याचे रक्षण करूया आणि त्याच्या चरणी कृतज्ञतेने नतमस्तक होऊया.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

## पीक कर्जासाठी शेतकऱ्यांची धावपळ वाढली

# डिजिटल सातबारा ठप्प

### सर्व्हर डाऊनमुळे ७/१२ मिळेना; खरीप हंगामाआधी शेतकरी संकटात

**आरंभ मराठी । धाराशिव**



ग्रामीण भागात सध्या पीक कर्जाच्या प्रक्रियेला वेग आला असताना अत्यावश्यक असलेले डिजिटल सातबारा (७/१२) व ८-अ उतारे मिळण्यात तांत्रिक अडथळे निर्माण झाले आहेत. महसूल विभागाच्या ऑनलाइन संकेतस्थळावर तांत्रिक बिघाड झाल्याने गेल्या काही दिवसांपासून ही सेवा ठप्प असून, हजारो शेतकरी कागदपत्रांसाठी अक्षरशः भटकंती करताना दिसत आहेत. परिणामी, खरीप हंगाम तोंडावर असताना पीक कर्ज मिळण्यात विलंब होऊन शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पीक कर्जासाठी बँकांकडून सध्या अर्ज स्वीकारले जात असून, त्यासाठी ७/१२ आणि ८-अ ही कागदपत्रे अनिवार्य आहेत. मात्र हीच कागदपत्रे ऑनलाइन उपलब्ध नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या फाईली अपूर्ण राहिल्या आहेत. बँकांचे उंबरठे झिजवूनही आवश्यक कागदपत्रांशिवाय पुढील प्रक्रिया होत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून महसूल विभागाने अनेक सेवा ऑनलाइन केल्यामुळे पूर्वी तलाठ्यांच्या कार्यालयात होणारी गर्दी कमी झाली होती. सेतू केंद्रे, सायबर कॅफे किंवा मोबाईलवरून सहज सातबारा काढता येत असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला होता. मात्र सध्याच्या तांत्रिक अडचणींमुळे हीच व्यवस्था कोलमडल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटीची मर्यादा, वारंवार सर्व्हर डाऊन होणे, तसेच तांत्रिक देखभालीचा अभाव यामुळे शेतकऱ्यांची कामे रखडत आहेत. अनेक ठिकाणी सेतू सेवा केंद्रांवर "सर्व्हर डाऊन" असे फलक लावलेले दिसतात. त्यामुळे दिवसभर प्रतीक्षा करूनही शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने घरी परतावे लागत आहे. डिजिटल साक्षरतेचा अभाव असलेल्या शेतकऱ्यांना याचा अधिक फटका बसत आहे.महसूल कार्यालयात प्रत्यक्ष गेल्यानंतरही शेतकऱ्यांना "ऑनलाइनच सातबारा काढा" असे सांगण्यात येते. मात्र ऑनलाइन सेवा बंद असल्याने शेतकऱ्यांसमोर कोणताही पर्याय उपलब्ध नाही. दरम्यान, पीक कर्जाशिवाय खरीप पेरणी करणे अनेक शेतकऱ्यांसाठी अशक्य असल्याने संपूर्ण हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बियाणे, खत आणि इतर खर्चासाठी कर्जावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे नियोजन विस्कळीत होत आहे. आर्थिक अडचणींसोबतच मानसिक तणावातही मोठी भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. सातबारा संकेतस्थळ त्वरित सुरू करून सर्व्हरची क्षमता वाढवणे, तांत्रिक बिघाडांबाबत नियमित व अधिकृत माहिती देणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत ऑफलाइन सातबारा व ८-अ उतारे देण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करणे गरजेचे आहे. डिजिटल व्यवस्थेवर वाढत्या अवलंबित्वाच्या पार्श्वभूमीवर अशा तांत्रिक अडचणी वारंवार निर्माण होत असल्यास त्याचा थेट फटका शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसणार आहे. त्यामुळे शासनाने डिजीटल सातबारा काढण्यात अडचणी येत असतील तर त्याला पर्यायी मार्ग काढण्याची गरज आहे.

## हरिनामाच्या गजरात दुमदुमली दाळींब नगरी



**आरंभ मराठी । दाळींब**

उमरगा तालुक्यातील दाळींब येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. ११ एप्रिलपासून सुरू झालेल्या या सप्ताहात भारूड, कीर्तन, भजन, प्रवचन आदी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. या सप्ताहादरम्यान समाजातील प्रत्येक व्यक्तीने आदर्श जीवन कसे जगावे याबाबत भाविकांना कीर्तन, भजन, प्रवचन आणि भारूड यांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामुळेही वातावरण अधिकच पवित्र आणि आध्यात्मिक झाले होते.सप्ताहाच्या सांगता प्रसंगी हनुमान चौक ते विठ्ठल-रुक्मिणी मंदिर दरम्यान पारंपरिक पद्धतीने भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. हरिनामाच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकीत भाविकांचा मोठा सहभाग होता. मिरवणूक पुन्हा हनुमान चौकात आल्यानंतर ह.भ.प. योगेश बप्पा इंगळे महाराज यांची कीर्तन सेवा झाली. यानंतर गुरुवर्य अप्पासाहेब दिंडेगावकर महाराज यांच्या हस्ते काला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताह सोहळ्यासाठी दाळींब व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी संत सोपान काका सेवा संघ, संत गोरोबा सेवा संघ, संत एकनाथ महाराज सेवा संघ, बजरंग सेवा संघ, संत मारुती महाराज सेवा संघ, संत नामदेव महाराज सेवा संघ तसेच दाळींब ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. सप्ताहादरम्यान संपूर्ण दाळींब नगरी हरिनामाच्या गजरात भक्तिमय झाली होती.

## पारगाव आरोग्य केंद्रात जनआरोग्य समितीची बैठक

### १.५ कोटींच्या नव्या इमारतीला मंजुरी, उत्कृष्ट सेविकेला ५ हजारांचे बक्षीस



**आरंभ मराठी । पारगाव**

पारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात जनआरोग्य समितीची बैठक उत्साही वातावरणात पार पडली. बैठकीत आरोग्य सेवांचा आढावा घेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे आरोग्य केंद्राच्या नव्या इमारतीसाठी तब्बल १.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली. जिल्हा परिषद सदस्य सविता विकास तळेकर यांनी ही माहिती देताना आरोग्य सेवेमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या उपकेंद्रातील आरोग्य सेविकेला ५ हजार रुपयांचे बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य केंद्राच्या विकासकामांबाबत बोलताना तळेकर यांनी स्पष्ट केले की, सध्याची इमारत जीर्ण झाल्याने नव्या इमारतीचे काम लवकरच टेंडर प्रक्रियेनंतर सुरू होईल. पिंपळगाव कमळेश्वर उपकेंद्रासाठी ४६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून वर्क ऑर्डर तयार आहे. येत्या काही दिवसांत कामाला सुरुवात होणार आहे. माजी आरोग्यमंत्री आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली दुरुस्ती, सजावट आणि औषध खरेदीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर रुग्णांसाठी स्वतंत्र बेडची व्यवस्था आणि विशेष आरोग्य पथक कार्यरत करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी मागील खर्चाचा तपशील व आगामी नियोजन समितीसमोर मांडले, ज्यास समितीने मंजुरी दिली. यावेळी सविता तळेकर यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या. रुग्णसेवेत कोणतीही तक्रार येणार नाही, याची दक्षता घ्या. प्रशासन तुमच्या पाठीशी आहे, पण कामात कसूर चालणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. बैठकीस जिल्हा परिषद सदस्य सविता तळेकर, पंचायत समिती सदस्य कोमल प्रदीप मोटे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. महेंद्रकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, सीडीपीओ भारती मॅडम यांच्यासह आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या आणि समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीएसआर अंतर्गत बालाजी अमाईन्सकडून तामलवाडी शाळेला रंगकाम



**आरंभ मराठी । तामलवाडी**

बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथील वर्गखोल्यांच्या रंगकामाचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांनी वर्गखोल्यांमध्ये रंगकाम करून त्यात बोलकी चित्रे, शैक्षणिक तक्ते व नकाशे तयार करून देण्याची मागणी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राम रेड्डी यांच्याकडे केली होती. या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत कंपनीच्या संचालक मंडळाने शाळेतील सर्व वर्गखोल्यांचे रंगकाम तसेच शैक्षणिक भित्तीचित्रे तयार करण्यास मंजुरी दिली.या उपक्रमाचा शुभारंभ बालाजी अमाईन्स तामलवाडी फॅक्टरीतील प्रोडक्शन मॅनेजर डी. पी. गायकवाड व ज्ञानेश्वर घोटकर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेचे वातावरण अधिक आकर्षक व आनंददायी होणार असून विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक सोपे व प्रभावी होईल, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सोमदेव गोरे, राजाराम वाघमारे, राजकुमार घोडके, श्रीमती ज्ञानेश्वरी शिंदे, श्रीमती स्मिता पाटोळे तसेच बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर व श्यामकुमार अकेन उपस्थित होते. शाळेतील सर्व वर्गखोल्यांचे रंगकाम, बोलकी चित्रे, नकाशे व तक्ते तयार करण्याचे काम बालाजी अमाईन्सच्या सीएसआर अंतर्गत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाबद्दल शिक्षक विठ्ठल नरवडे यांनी व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळाचे आभार मानले.

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 65 गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**आरंभ मराठी । धाराशिव**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्था, धाराशिव यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शहरातील तसेच परिसरातील विविध शाळांमधील ६५ गरजू विद्यार्थ्यांना एक वर्षभर पुरेल इतक्या शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियवंदा महाडदळकर, तहसीलदार श्रीमती मृणाल जाधव, नगर परिषद धाराशिवच्या मुख्याधिकारी श्रीमती निता अंधारे तसेच नायब तहसीलदार महादेव शिंदे यांनी उपस्थिती दर्शवून उपक्रमाचे कौतुक केले. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध झाली असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मोठा हातभार लागणार आहे, असे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमाला माजी मुख्याध्यापक अजय कामतकर, व्यवस्थापक बालाजी बोंदर, दादा ठोकळ, भाऊसाहेब धावारे, अशोक बनसोडे, प्रताप सोनटक्के, अंकुश उबाळे, संगीता शिंदे, सुरेखा देशमाने, त्रिशाला ठाणअंबीर, प्रविण सोनटक्के, श्रीमंत पालके, प्रा. डॉ. एच. जी. सपकाळ यांची उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष नागनाथ गोरसे, उपाध्यक्ष रोहिदास झेंडे, सचिव धनंजय वाघमारे, संचालक राजेंद्र आंगरखे, ॲड. अनुरथ नागटीळक, दिपक सरवदे, बलभीम कांबळे, संपत शिंदे, भाऊसाहेब झेंडे, रमेश कांबळे, पांडुरंग आलटे, सिद्राम वाघमारे, राजेंद्र धावारे आदींच्या हस्तेही विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. हा उपक्रम गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत असून यंदाही अनेक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहकार्य केले. दिपक आदटराव, डॉ. मृणाल धावारे, सुधाकर मस्के, निनाद समुद्र, भागवत धावारे, अशोक ओव्हाळ, दिपक केंगार, वैभव कांबळे, बन्सी कुचेकर, बाबासाहेब बनसोडे, अरुण पवार, संगीता शिंदे, नवनाथ वाघमारे, सोमनाथ वाघमारे, प्रकाश क्षिरसाट, शिलाबाई चंदनशिवे, माईसाहेब वाघमारे, अभियंता सुमीत सुकाळे, रोहन कांबळे, गणेश वाघमारे, संजय गजधने यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. अनुरथ नागटीळक यांनी केले, तर दिपक सरवदे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

दैनिक आरंभ मराठी

## जिल्ह्यातील एकाही यात्रेत यंदा टुरिंग टॉकीज नाही

# टुरिंग टॉकीज अस्ताच्या उंबरठ्यावर; ग्रामीण मनोरंजनाचे हक्काचे साधन पडद्याआड हरवले

**सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी**

**तेर - ग्रामीण भागातील जनतेसाठी एकेकाळी हक्काचे आणि सर्वाधिक लोकप्रिय मनोरंजन माध्यम असलेला टुरिंग टॉकीज व्यवसाय सध्या डबघाईला आला असून अस्तित्व टिकवण्यासाठी झगडताना दिसत आहे. गावोगावी तंबू उभारून चित्रपट दाखवणाऱ्या या फिरत्या चित्रपटगृहांनी एक काळ गाजवला होता. मात्र बदलत्या काळानुसार आधुनिक मनोरंजनाच्या साधनांनी त्यांची जागा घेतल्याने हा व्यवसाय आता अस्ताच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. धाराशिव जिल्ह्यात देखील तेर, येरमाळा येथील जत्रेत पूर्वी टुरिंग टॉकीज असायच्या. परंतु, मागील दोन वर्षांपासून एकही टुरिंग टॉकीज येत नाही.**



पूर्वी ग्रामीण भागात कायमस्वरूपी चित्रपटगृहे नसल्यामुळे टुरिंग टॉकीज हीच चित्रपटप्रेमींसाठी एकमेव सोय होती. पावसाळ्याचे चार महिने वगळता उर्वरित आठ महिने गावागावांत फिरून चित्रपट दाखवले जात. नव्या चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी गावकऱ्यांची मोठी गर्दी होत असे. तंबूमध्ये जमिनीवर बसून चित्रपट पाहण्याचा तो अनुभवच वेगळा होता. कष्टकरी आणि सर्वसामान्य लोकांसाठी हेच खरे मनोरंजनाचे व्यासपीठ होते.मात्र सध्याच्या काळात परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. दूरचित्रवाणीवरील शेकडो चॅनेल्स, मल्टिप्लेक्स संस्कृती, तसेच मोबाईलवरील सहज उपलब्ध मनोरंजनामुळे प्रेक्षकांनी टुरिंग टॉकीजकडे पाठ फिरवली आहे. नव्या चित्रपटांच्या सीडी किंवा डिजिटल आवृत्त्या काही दिवसांतच उपलब्ध होत असल्याने चित्रपटगृहात जाऊन पाहण्याचे आकर्षण कमी झाले आहे. याशिवाय ग्रामीण भागातील यात्रा-जत्रांचे स्वरूपही बदलले आहे. येरमाळा आणि तेर येथील पारंपरिक पंधरा दिवस चालणाऱ्या यात्रा आता चार दिवसांवर आल्या आहेत. त्यामुळे टुरिंग टॉकीजचा व्यवसाय फक्त या मर्यादित कालावधीपुरताच राहिला आहे. त्यातही उत्पन्न कमी होत असल्याने अनेक व्यावसायिकांनी टॉकीज उभारणे टाळले आहे. सरकारकडून मल्टिप्लेक्सला मोठ्या प्रमाणावर करसवलती दिल्या जात असताना टुरिंग टॉकीजकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यावसायिक व्यक्त करत आहेत. आवश्यक सवलती आणि प्रोत्साहन मिळाले असते, तर हा पारंपरिक व्यवसाय टिकून राहू शकला असता, असे मत व्यक्त होत आहे. फिरत्या चित्रपटगृहांचे एक स्वतंत्र आणि समृद्ध असे मनोरंजन विश्व होते. गोल तंबूमध्ये मातीच्या ढिगाऱ्यावर बसून चित्रपटाचा आनंद घेणारे प्रेक्षक आता केवळ आठवणीत उरले आहेत. "गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी," अशीच भावना आज ग्रामीण भागात व्यक्त होत असून टुरिंग टॉकीजचा पडदा हळूहळू कायमचा खाली येण्याच्या मार्गावर आहे.

## उमरगा तालुक्यात अवैध वृक्षतोडीचा सुळसुळाट: प्रशासनाच्या दुर्लक्षावर नागरिकांचा संताप



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यात सध्या अवैध वृक्षतोड आणि बेकायदेशीर लाकूड वाहतुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले असून, संबंधित विभागांच्या दुर्लक्षामुळे परिस्थिती गंभीर बनत चालली आहे. "झाडे लावा, झाडे जगवा" या मोहिमेचा गाजावाजा होत असताना प्रत्यक्षात मात्र झाडांची सर्रास तोड होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंबा, चिंच, जांभूळ, बोर यांसारख्या फळझाडांची विनापरवाना मोठ्या प्रमाणावर तोड सुरू आहे. काही व्यापाऱ्यांकडून बेकायदेशीररित्या लाकडाची वाहतूक केली जात असून, ही वाहतूक चेकपोस्ट टाळून पर्यायी मार्गाने केली जात असल्याचे समोर आले आहे. तसेच औद्योगिक वसाहतींमध्ये बॉयलरसाठी या लाकडाचा वापर होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकारांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून वन्यजीवांचे अधिवास धोक्यात आले आहेत. परिणामी, वन्यप्राणी गावांकडे वळत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरीही वनपरिक्षेत्र विभाग व तहसील महसूल प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याची तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे. उमरगा येथील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय अस्तित्वात असूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रशासनाकडे काही ठोस मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये अवैध वृक्षतोडीवर तात्काळ बंदी घालणे, संबंधित विभागांनी संयुक्त मोहिम राबवणे, बेकायदेशीर लाकूड वाहतूक रोखण्यासाठी विशेष पथके नेमणे, दोषींवर कठोर कारवाई करणे तसेच घरगुती गॅस टंचाई दूर करण्यासाठी उपाययोजना करणे यांचा समावेश आहे.महाराष्ट्र लोक विकास मंच युवक कार्यकारिणीच्या वतीने या मागण्या करण्यात आल्या. यावेळी निखिल वाघ, दिनेश बिराजदार, उमेश अबचाने, संकेत लवटे, आकाश मोरे, धीरज कांबळे, विजय टाकले, अक्षय कांबळे आदी उपस्थित होते.

# एक एकर कलिंगडातून तीन लाखांचे उत्पन्न

## युवा शेतकऱ्याची आधुनिक तंत्रज्ञानातून प्रयोगशील शेती





**आरंभ मराठी । पळसप**

पळसप येथील प्रगतशील शेतकरी दयानंद नरवडे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कलिंगड पिकातून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अवघ्या एका एकर क्षेत्रातून तब्बल तीन लाख रुपयांच्या घरात उत्पन्न मिळवत त्यांनी इतर शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. नरवडे यांनी नुन्हेम्स (बीएएसएफ) कंपनीच्या 'फोर्स नाईन' या सुधारित वाणाची सुमारे ७ हजार रोपांची लागवड केली. लागवडीपासून ते काढणीपर्यंत त्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने पिकाचे व्यवस्थापन केले. योग्य खत व्यवस्थापन, नियोजनबद्ध पाणीपुरवठा आणि वेळेवर रोग व कीड नियंत्रण यामुळे त्यांचा कलिंगडाचा प्लॉट अत्यंत उत्तम स्थितीत आला. यंदा बाजारात कलिंगडाला चांगला दर मिळाल्याने त्यांच्या उत्पन्नात मोठी भर पडली. एका एकरातून सुमारे ३० टन उत्पादन घेत त्यांनी हे कलिंगड कर्नाटकातील व्यापाऱ्यांना थेट शेतातूनच प्रति किलो १२ रुपये दराने विक्री केले. त्यामुळे वाहतूक व मध्यस्थांचा खर्च वाचून त्यांना अधिक फायदा मिळाला. एकूण खर्च वजा जाता नरवडे यांना सुमारे २ लाख ७० हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील शेतकऱ्यांना कमी क्षेत्रात अधिक उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची प्रेरणा मिळत आहे.

## मुळज येथे महसूल समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### ३०० हून अधिक नागरिकांना लाभ




**आरंभ मराठी । उमरगा**

जनसामान्यांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळावी तसेच नागरिकांची कामे एकाच छताखाली पूर्ण व्हावीत या उद्देशाने शासनाच्या वतीने मुळज येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात मुळज मंडळातील सुमारे १५ गावांतील ३०० हून अधिक लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून विविध योजनांचा लाभ घेतला. नागरिकांच्या विविध समस्या तत्काळ सोडविण्यावर भर देण्यात आला. शिबिरामध्ये जमिनीचे नोंद (७/१२ उतारा), फेरफार, वारस नोंद, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र तसेच विविध सामाजिक सहाय्य योजनांशी संबंधित प्रकरणे प्राधान्याने हाताळण्यात आली.संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या तक्रारी ऐकून अनेक प्रकरणांवर जागीच कार्यवाही केली, तर काही गुंतागुंतीच्या प्रकरणांसाठी निश्चित कालमर्यादा देण्यात आली. या उपक्रमामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्यांपासून मोठा दिलासा मिळाला असून प्रशासनाविषयी विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या शिबिराला आमदार प्रवीण स्वामी, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष बाबा पाटील, जिल्हा परिषद सदस्य अर्चनाताई युवराज जाधव, पंचायत समिती उपसभापती रेखाताई विक्रम इंगळे, सदस्य दगडू मोरे, तुकाराम भैय्या जाधव, रवींद्र हंगरगे, तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार, माजी सैनिक संघटना अध्यक्ष शहाजी चालुक्य तसेच सरपंच शिवकन्या महेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी आमदार प्रवीण स्वामी व तहसीलदार गोविंद येरमे यांनी नागरिकांना विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी दीपक चव्हाण व ग्राम महसूल अधिकारी रोहित चामले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माडज-एकुरगा वाडी शिवरस्ता अतिक्रमणमुक्त; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**आरंभ मराठी । माडज**



माडज ते एकुरगा वाडी दरम्यानचा शिवरस्ता तसेच बेट परिसरातून जाणारा सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता प्रशासनाच्या कारवाईतून अतिक्रमणमुक्त करून पूर्णपणे खुला करण्यात आला आहे. या कारवाईमुळे स्थानिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून वाहतुकीची अडचण दूर झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून या मार्गावर झालेल्या अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद झाला होता. परिणामी शेतकरी व ग्रामस्थांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वारंवार तक्रारीनंतर प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेत नियोजनबद्ध पद्धतीने अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबवली. संबंधित विभागाच्या पथकाने पोलिस बंदोबस्तात कारवाई करत रस्ता पूर्णपणे मोकळा केला. या वेळी प्रशासन, पोलीस व स्थानिक शेतकरी यांचा समन्वय दिसून आला. या कारवाईदरम्यान भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी पठाण हैदर, प्रणव शिंदे, मंडल अधिकारी जयंत गायकवाड, ग्राम महसूल अधिकारी एस. एस. गिरी, तसेच पोलीस विभागातील महिला अधिकारी एम. बी. गुंड, व्ही. एम. चव्हाण, पोलीस पाटील मारुती कुंभार यांच्यासह गावातील अनेक शेतकरी व नागरिक उपस्थित होते. रस्ता खुला झाल्यामुळे शेतीकामासाठी वाहतूक सुलभ झाली असून शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत. भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना करण्याचेही प्रशासनाने नियोजन केले आहे.

## मंथन परीक्षेत पारुनगर शाळेचे यश

### १८ विद्यार्थी गुणवंत यादीत

**मुरूड** :-मुरुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारुनगरने मंथन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा छाप पाडली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालानुसार शाळेतील तब्बल 18 विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या गुणवंत यादीत स्थान मिळवले असून, 64 विद्यार्थ्यांनी 200 पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. इयत्ता 1 ली ते 7 वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या यशात मोलाचा वाटा उचलला आहे. त्यामध्ये इयत्ता 1 लीचे 3, 2 रीचे 5, 3 रीचे 4, 4 थीचे 2, 5 वीचे 2, 6 वीचे 1 आणि 7 वीचा 1 विद्यार्थी अशा एकूण 18 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, अनेक विद्यार्थ्यांनी तालुका व जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. या यशानिमित्त शाळेत यशस्वी विद्यार्थ्यांचा तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत सातत्य, शिस्त आणि योग्य मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे सांगितले. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनीही विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत शिक्षकांच्या परिश्रमांचे अभिनंदन केले.

## व्ही.पी. कृषि महाविद्यालयाचे कॅम्पस प्लेसमेंटमध्ये दमदार यश; 13 विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड




**आरंभ मराठी । धाराशिव**

व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील कृषि महाविद्यालयात दिनांक १७ एप्रिल रोजी Ideal Agri Search Pvt. Ltd. या नामांकित कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या निवड प्रक्रियेत अंतिम वर्षातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी १३ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. ही कंपनी पिकांच्या आरोग्यवृद्धीसाठी जैविक खते, सूक्ष्मअन्नद्रव्ये, वनस्पती वाढ नियंत्रक तसेच पाण्यात विद्रव्य खते यांसारख्या विविध कृषी निविष्ठा उपलब्ध करून देणारी अग्रगण्य संस्था असून खत निर्मिती क्षेत्रातही कंपनीची उल्लेखनीय कामगिरी आहे. कॅम्पस मुलाखती कंपनीचे डेव्हलपमेंट हेड वैभवकुमार एस. जाधव व रिजनल हेड प्रवीण महिंद यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये संकेत सांगुळे, ज्ञानेश्वर माळी, सौरभ मदने, अभिषेक अनुभूले, अजय घेवारे, अभिजित घुगे, अनिकेत शेंडगे, प्रतिक्षा साखरे, दिप्ती जाधव, राजश्री पाठक, सरिता गंजे, प्रतीक्षा मस्के आणि भक्ती चौधरी यांचा समावेश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये कंपनीच्या कार्यक्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. सध्याच्या बेरोजगारीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा केलेला हा प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरत आहे. या यशाबद्दल धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शेख मोहसीन यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली.

## शाश्वत विकास ध्येय जिल्हा निर्देशक आराखड्याचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

**आरंभ मराठी । धाराशिव**




जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा निश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'शाश्वत विकास ध्येय-जिल्हा निर्देशक आराखडा, धाराशिव जिल्हा' या सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या दोन पुस्तकांचे प्रकाशन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार आणि अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमाला अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई येथील अतिरिक्त आयुक्त भांगे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे प्र. उपआयुक्त सु.न.जाधव तसेच सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर श्रीकांत कुंटला यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालय, धाराशिव येथील कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाश्वत विकासाच्या विविध निर्देशकांवर आधारित तयार करण्यात आलेला हा आराखडा जिल्ह्याच्या नियोजन प्रक्रियेस दिशा देणारा ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. जिल्हा निर्देशक विकास आराखडा हा केवळ आकडेवारीचा संच नसून, जिल्ह्याच्या विकासाचा मार्गदर्शक नकाशा आहे. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, पर्यावरण संवर्धन, महिला व बालकल्याण, रोजगार निर्मिती अशा विविध क्षेत्रांतील प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी या आराखड्यात ठोस निर्देशक निश्चित करण्यात आले आहेत. यामुळे विकासाच्या कामांना अधिक पारदर्शकता, परिणामकारकता आणि गती मिळणार आहे. तसेच, या आराखड्याच्या माध्यमातून प्रशासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सुलभ होणार असून, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून जिल्ह्याच्या गरजेनुसार प्राधान्यक्रम ठरवता येणार आहे. परिणामी, शाश्वत आणि समतोल विकास साध्य करण्यासाठी हा आराखडा मार्गदर्शक ठरेल,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

दैनिक आरंभ मराठी — पिढ्यान्पिढ्या बंद असलेला रस्ता खुला झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा

## तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या प्रयत्नामुळे लोहटा (प.) येथील शेतरस्ता झाला मोकळा

**आरंभ मराठी । कळंब**





गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेला कळंब तालुक्यातील मौजे लोहटा (पश्चिम) येथील गट क्रमांक 239 ते 249 मधील गाव नकाशावरील शेतरस्ता अखेर प्रशासनाच्या ठोस आणि धडाकेबाज कारवाईने अतिक्रमणमुक्त करण्यात आला. या कारवाईत कळंबचे तहसीलदार हेमंत ढोकले यांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका निर्णायक ठरली असून त्यांच्या कार्यशैलीचे तालुकाभर कौतुक होत आहे. गट क्रमांक 239 मधील शेतरस्ता गेल्या 30 ते 40 वर्षांपासून प्रत्यक्षात अस्तित्वातच नव्हता. या मार्गावर अतिक्रमण करून शेती केली जात होती. मात्र तहसीलदार ढोकले यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत उसाच्या सरी काढून रस्ता मोकळा करून घेतला. त्यांच्या या प्रत्यक्ष सहभागामुळे कारवाईला गती मिळाली. लोहटा (पश्चिम) येथील शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात अर्ज केल्यानंतर ढोकले यांनी विलंब न लावता स्थळ पाहणी केली. संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले, प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला आणि महसूल यंत्रणेला तत्काळ कामाला लावले. पंचनामा करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 50 अंतर्गत आदेश पारित करण्यात आला. त्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करत दिनांक 16 एप्रिल 2026 रोजी प्रशासनाने शेतरस्ता खुला करून दिला. अनेक पिढ्यांपासून बंद असलेला रस्ता पुन्हा सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. 'शेतीचा आत्मा म्हणजे शेतरस्ता' ही म्हण यानिमित्ताने पुन्हा एकदा खरी ठरली आहे. रस्ता उपलब्ध झाल्यामुळे शेतमालाची वाहतूक, मशागतीची साधने ने-आण आणि दैनंदिन शेतीकामे सुलभ होणार आहेत. या कारवाईवेळी मंडळ अधिकारी सुतार, तलाठी शिंदे, पोलिस प्रशासन, महसूल कर्मचारी तसेच संबंधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील अनेक शेतरस्ते आजही अतिक्रमणामुळे बंद अवस्थेत आहेत. गावपातळीवरील वाद, तंटे आणि वैयक्तिक भूमिका यामुळे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. मात्र प्रशासनाने पुढाकार घेऊन थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन न्याय दिल्यास प्रश्न सुटू शकतात, हे या कारवाईतून अधोरेखित झाले आहे.

## सह्याद्री पोदार लर्न स्कूलचा CBSE दहावीचा निकाल 100 टक्के; शरयू येलगटे 96% गुणांसह अव्वल



**आरंभ मराठी । मुरुड**

मुरुड येथील सह्याद्री पोदार लर्न स्कूलने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) दहावीच्या परीक्षेत यंदा शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. १५ एप्रिल २०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून, अनेकांनी उत्कृष्ट गुण संपादन करत शाळेचा लौकिक अधिक उंचावला आहे.या परीक्षेत शाळेची विद्यार्थिनी शरयू येलगटे हिने ९६% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. अथर्व मगर व समृद्धी फुटाणे यांनी प्रत्येकी ९४% गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. गुणवंत विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले. विशेष म्हणजे, २५% विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले, तर ६७% विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. या निकालामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून पालक व नागरिकांकडून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा असल्याचे शाळा व्यवस्थापनाने नमूद केले. यानिमित्त शाळेतील शिक्षकवृंदाचा संस्थेकडून सत्कार करण्यात आला.शाळेचे अध्यक्ष आदित्य पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सचिव श्रुती पाटील आणि प्राचार्य विराज माकणीकर यांनी विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच हा १००% निकाल शक्य झाल्याचे सांगत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भविष्यातही असेच उज्ज्वल निकाल देण्याचा संकल्प शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

आरंभ मराठी

नांदुरीत शाळेचा सांस्कृतिक जल्लोष; स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे रंगतदार सादरीकरण

–

धाराशिव; तुळजापूर तालुक्यातील नांदुरी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात आणि दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री दूधंबे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच हनुमंत पाटील, प्रतिष्ठित नागरिक मोहन बापू मुळे, नाना मुळेकर, महादेव भाऊ सरडे, गंगाधर सरडे, विकास गाडेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर सरडे, उपाध्यक्ष सौ. मीरा गाडेकर, पोलीस पाटील मुळुक मॅडम तसेच तामलवाडी पोलीस स्टेशनचे लवटे व गावडे उपस्थित होते.

